# फ्लोरेन्स नाइटिंगेल

लेखिका: एम्मा फिशेल

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन



# फ्लोरेन्स नाइटिंगेल

“चला, युरोपचा एक मोठा दौरा करू,” श्रीमती *नाइटिंगेल* श्रीयुत *नाइटिंगेल* यांना म्हणाल्या, “श्रीमंत लोक करतात तसं.”

दौऱ्यावरून घरी परतेपर्यंत त्यांना दोन अपत्ये झाली होती. अपत्यांचा जन्म ज्या शहरांत झाला, त्या शहरांवरून त्यांनी त्यांचे नामकरण केले – *पार्थेनोप* आणि *फ्लोरेन्स*.




पार्थेनोप फ्लोरेन्स



नाइटिंगेल कुटुंब इंग्लंडच्या *डर्बीशायर* प्रांतातील एका घरात राहात. ते घर खूप मोठे होते, परंतु श्रीमती नाइटिंगेलना ते पुरेसे मोठे वाटत नसे.

म्हणून त्यांनी *हॅम्पशायर* प्रांतात आणखी मोठे घर खरेदी केले.

त्या घरात फ्लोरेन्सला खेळायला भरपूर खेळणी आणि पाळीव प्राणी होते आणि सत्तावीस चुलत भावंडेसुद्धा.



त्याकाळी मुलींचे जीवन खूप वेगळे होते. गरीब मुलींना शिकायला एकही शाळा नव्हती. श्रीमंत घरच्या मुलींनाही जास्त शिक्षण दिले जात नव्हते.

तरी फ्लोरेन्सने आपल्या वडिलांच्या पाठिंब्याने बरेच शिक्षण घेतले.




फ्लोरेन्सची आई चिंतित होत असे. “जास्त शिकलेल्या मुलींना कुणी पसंत करत नाहीत!“ ती म्हणे. “पियानो वाजव, विणकाम कर, फुलं सजव – हे सगळं शिकून घे, फ्लोरेन्स!”

पण फ्लोरेन्सला फुले सजवण्यापेक्षाही जास्त काही करण्याची इच्छा होती.



फ्लोरेन्स सतरा वर्षांची असताना नाइटिंगेल कुटुंब पुन्हा युरोपला गेले. त्यांनी अनेक देशांचे दौरे केले आणि खूप मौजमस्तीही केली.




पण खूप फिरल्यावर फ्लोरेन्सला कंटाळा आला. घरी परतल्यावर ती खुश झाली.

“खूप झाल्या पार्ट्या, आतातरी मला गणित शिकू दे,” तिने आर्जवी स्वरात म्हटले.




तिच्या आईवडिलांना तिचा हा निर्णय अजिबात पसंत पडला नाही.

मग फ्लोरेन्सने आईवडील परवानगी देतील असे काहीतरी करायचा विचार केला. ती गरीब आणि आजारी लोकांना भेटू लागली, त्यांना शक्य तेवढी मदत करू लागली.







फ्लोरेन्सला हे ज्ञान मिळवणे आवश्यक वाटू लागले. “एखाद्या हॉस्पीटलमध्ये काम करायला हवं,” ती मनाशी म्हणाली.

फ्लोरेन्सला हॉस्पीटलमध्ये काम करायचे आहे, हे ऐकून तिचे वडील रागावले. त्याकाळातील हॉस्पीटल आजच्यासारखी नव्हती.

“नर्सिंग?” आईने म्हटले. “लाज वाटते मला! त्यापेक्षा स्वयंपाकीण हो!”

पण एका व्यक्तिने फ्लोरेन्सची बाजू घेतली. ते होते *सिडनी हर्बर्ट*, एक अत्यंत प्रतिष्ठित व्यक्ति.




“नर्सिंग क्षेत्राला तुझ्यासारख्या लोकांची गरज आहे. तुला खरोखरंच शिकायचं असेल तर या पुस्तकांपासून सुरुवात कर!”





फ्लोरेन्सने पुस्तके घेतली आणि त्यांचा अभ्यास केला, एकांतात, गुपचुप.

पुस्तके वाचून फ्लोरेन्सला उमगले की तिला बरेच बदल घडवून आणावे लागतील.



फ्लोरेन्स एकोणतीस वर्षांची झाली तेव्हा *रिचर्ड मॉन्कटन मिल्नेस* नावाच्या एका पत्रकाराने तिला लग्नाची मागणी घातली.

“मी एकाचवेळी चांगली नर्स आणि चांगली पत्नी बनू शकत नाही. त्यामुळे हा प्रस्ताव मान्य करू शकत नाही,” फ्लोरेन्स उदासपणे उत्तरली.



“आम्ही तुला परदेशी पाठवू,” तिची आई म्हणाली. “त्यामुळे तरी नर्स बनायचा वेडा विचार तुझ्या डोक्यातून निघून जाईल!”

कैसरवर्थ इन्स्टिट्यूट
स्वयंसेवी नर्सचे स्वागत आहे!




पण असे काहीच घडले नाही. याउलट, परदेशात असताना फ्लोरेन्सला शिकून घेण्याची संधी गवसली. तिथे तिला रोखायला कुणीच नव्हते.

हॉस्पीटलमध्ये फ्लोरेन्स रोज सकाळी पाच वाजता उठत असे व रात्री उशीरापर्यंत काम करत असे.




तीन महिन्यांनी ती घरी परतली तेव्हा अभ्यास करायला घरातच तिला खूप काम मिळाले.

फ्लोरेन्स आपल्या आजारी कुटुंबियांची शुश्रुषा करत होती तेव्हा तिची ख्याती दूरदूरवर पसरली. तिला एक मोठे हॉस्पीटल चालवण्याची विनंती करण्यात आली.



हॉस्पीटल चालवायचे म्हणजे तेथील सगळी कामे स्वतःच करायची, हे फ्लोरेन्सला लवकरच उमगले. याच काळात विषमज्वर या भयंकर रोगाची साथ पसरली.




साथीमध्ये हजारो लोक आजारी पडले. फ्लोरेन्स विषमज्वर रुग्णांनी भरलेल्या एका हॉस्पिटलमध्ये गेली.



कुटुंबियांना तिची काळजी वाटू लागली. विषमज्वर पट्कन होऊ शकतो. त्याने कित्येक लोकांचा जीव घेतला होता.



पण रोगाची साथ हा एकच धोका नव्हता. रशिया आणि तुर्कस्थान यांच्यात युद्ध सुरू झाले होते. एका वर्षानंतर, ब्रिटन आणि फ्रान्सही रशियाविरुद्ध उभे ठाकले.

लवकरच एक वाईट बातमी आली.



द टाइम्स 14 ऑक्टोबर 1854

14 October 1854

रणांगणापेक्षा हॉस्पीटलमध्ये जास्त मृत्यू

- विल्यम हॉवर्ड रसेल

जखमी सैनिकांना तुर्कस्थानच्या *स्कुटारी* गावात नेत. पण तिथे डॉक्टरांच्या मदतीसाठी एकही नर्स नव्हती.

“सैनिक निष्कारणच मरतायत. मला काहीतरी केलं पाहिजे,” फ्लोरेन्सच्या मनात आले.

म्हणून फ्लोरेन्सने सिडनी हर्बर्ट यांना पत्र लिहिले....




पूर्वी सिडनी हर्बर्टने फ्लोरेन्सला लिहिले होते तसेच.




सिडनी हर्बर्टने फ्लोरेन्सला स्कुटरी गावचे हॉस्पीटल चालवायची विनंती केली. लवकरच फ्लोरेन्स आणि अडतीस नर्सचा ताफा तुर्कस्थानकडे रवाना झाला.




4 नोव्हेंबर 1854 रोजी ते स्कुटरीला पोहोचले. त्यावेळी फ्लोरेन्स चौतीस वर्षांची होती.

तेथील हॉस्पीटल कोंदट आणि गलिच्छ होते. सर्वत्र जखमी सैनिक पडून होते, काही मरत होते आणि अधिकाधिक जखमी सैनिक येतच होते.

तिथे खूप अस्वच्छता होती. तेथील पाणी स्वच्छ नव्हते. तिथे औषधे, बँडेज, साबण, टॉवेल या आवश्यक वस्तुंची उणीव होती.

जखमी सैनिकांची अवस्था सुधारण्याऐवजी आणखी बिघडत चालली होती.



“आधी सैनिकांना स्वच्छ करून चांगलं खाऊ-पिऊ घातलं पाहिजे,” फ्लोरेन्स म्हणाल्या. मग सर्व नर्स या कामात गुंतल्या.



मग फ्लोरेन्सने एक घर भाड्याने घेतले. तिथे सैनिकांच्या चादरी आणि कपडे धुण्यासाठी लाँड्री सुरू केली.

या कामादरम्यान तिला झोप फारशी मिळाली नाही.



तिला दररोज नवनव्या समस्यांना सामोरे जावे लागत असे.




याउपर वाईट गोष्ट म्हणजे, काही डॉक्टरना आणि सैन्यातील काही अधिकाऱ्यांना फ्लोरेन्स आवडत नव्हती, तिचे काम आवडत नव्हते.

"युद्धकाळात हॉस्पीटल कसं चालवायचं, हे एका बाईला काय कळणार?" ते म्हणू लागले.





पण फ्लोरेन्सने ठामपणे त्यांच्याकडून कामे करून घेतली. हळूहळू, हॉस्पिटलची स्थिती सुधारू लागली.

जखमी सैनिकांना फ्लोरेन्सबद्दल खूप आदर वाटू लागला. तिने त्यांना बरे करण्यासाठी जीवाचे रान केले होते.

तिने इंग्लंडहून पुस्तके, खेळ आणि फ्रान्सहून बुद्धिबळ मागवले.

ज्या सैनिकांना लिखाण जमत नसे, त्यांना ती स्वतः पत्रे लिहून देत असे.



दररोज ती सैनिकांना शुभरात्री म्हणण्यासाठी प्रत्येक वॉर्डमध्ये फेरी मारत असे.




सैनिक फ्लोरेन्सला *कंदीलवाली ताई (लेडी विथ द लँप)* म्हणू लागले.

मग फ्लोरेन्स स्वत: गंभीर आजारी पडली. तिच्या जगण्या-मरण्याची कुणालाच खात्री नव्हती, तब्बल बारा दिवस.

तोवर इंग्लंडमधील लोकांपर्यंत तिच्याविषयी, तिच्या धाडसी कार्याविषयी बातमी पोहोचली.

लोक तिची बातमी ऐकण्यास आतुर असत.

युद्ध थांबल्यावर, इंग्लंडमध्ये फ्लोरेन्सच्या स्वागतासाठी मोठा समारंभ आयोजित करण्यात आला.

पण फ्लोरेन्सला हा सारा बडेजाव पसंत नव्हता. तिने आयोजकांना चकवले.



महाराणी *व्हिक्टोरिया*ने फ्लोरेन्सला स्कॉटलंडमध्ये आपल्यासोबत राहाण्याचे निमंत्रण दिले.




फ्लोरेन्सने महाराणीला स्कुटरीतील भीषण परिस्थितीची माहिती दिली. “आपण वेळीच उपाययोजना केली नाही तर परिस्थिती चिघळेल,” ती म्हणाली.

मग फ्लोरेन्सने महाराणीला आपल्या काही कल्पना ऐकवल्या.



“तिच्या ज्ञानाने आणि परिपक्वतेने आम्ही खूप प्रभावित झालो,” महाराणी म्हणाल्या.




फ्लोरेन्सला फक्त सैन्याचे हॉस्पीटल बदलायचे नव्हते.

तिने गरीबातील गरीब लोक राहातात, अशा अनाथालयांचे दौरे केले. ती झोपडपट्ट्यांमध्ये फिरली. तिथे लोक दाटीवाटीने राहात. तिथे आजार वेगाने पसरत.

काय चुकतेय? ती विचार करू लागली, परिस्थिती सुधारण्यासाठी उपाय शोधू लागली.

काय करायला हवे, याविषयी ती समाजातील मातब्बर लोकांना सांगू लागली, त्यांनी तिच्या बोलण्याकडे सपशेल दुर्लक्ष केले तरीही.


हळूहळू, तिने आपले काम पूर्ण केले.




गरीबांचे मृत्यू टाळण्याचे दहा मार्ग.

सिडनी हर्बर्ट यांना फ्लोरेन्सची काळजी वाटू लागली. “तू कामात जास्तच बुडून गेलीयस,” ते म्हणाले.

“एवढं पुरेसं नाही, सिडनी! आता मी भारतासंबंधी काही योजना बनवतेय,” फ्लोरेन्स म्हणाली.




भारत खूप दूर अंतरावर होता आणि त्याकाळी तिथे इंग्रजांचे राज्य होते. तिथे लाखो लोक आजार आणि भुकेने मरत होते.

फ्लोरेन्सने संपूर्ण भारतातील डॉक्टरांना पत्रे लिहिली. तिने त्यांना बऱ्याच शंका विचारल्या.



तिला तिच्या शंकांची उत्तरे आली. भारताच्या समस्यांवरील आपल्या एका अहवालात तिने ही उत्तरे नोंदवली. हा अहवाल दोन हजार पानांचा होता.

शासनाने नर्ससाठी एक प्रशिक्षण शाळा सुरू केली आणि तिला फ्लोरेन्सचे नाव दिले. येथे प्रशिक्षण घेताना विद्यार्थी हॉस्पिटलमध्ये राहात.







चाळीस आणि साठ वयादरम्यान फ्लोरेन्स अनेकदा आजारी पडली. पण बिछान्याला चिकटून तिने काम करणे बंद केले नाही. तिच्या मांजरी मात्र तिच्या बिछान्यात सुस्तपणे पडून राहात.


फ्लोरेन्स आपल्या विद्यार्थ्यांशी फार दयाळुपणे वागत असे. ती त्यांच्यासाठी चहापान आयोजित करत असे. ते सुट्टीवर जाताना ती त्यांना पैसेही देत असे.

फ्लोरेन्स ऐंशी वर्षांची झाली तेव्हा तिची दृष्टी बरीच अंधुक झाली आणि तिला आपले काम थांबवावे लागले. त्याच वर्षी महाराणी व्हिक्टोरियाचे निधन झाले.

नवा राजा, *एडवर्ड सातवा*, याने फ्लोरेन्सला *ऑर्डर ऑफ मेरीट* हा विशेष सन्मान दिला. पहिल्यांदाच हा सन्मान कुणा स्त्रीला देण्यात आला होता.




वयाच्या नव्वदाव्या वर्षी फ्लोरेन्सचा मृत्यू झाला. लोकांनी तिचा अंत्यसंस्कार मोठ्या समारंभपूर्वक *वेस्टमिन्स्टर अॅबे* येथे केला.




खरंतर, फ्लोरेन्सने आपल्या मृत्युनंतर कोणताही समारंभ आयोजित करू नये, असे लोकांना सांगितले होते.

## आणखी काही माहिती

### डॉक्टर आणि नर्स

पहिल्या ब्रिटीश स्त्री डॉक्टरला अभ्यासासाठी अमेरिकेला आणि स्वित्झर्लंडला जावे लागले. त्याकाळी ब्रिटीश विद्यापीठांत केवळ पुरूषच शिकू शकत असत.





नाइटिंगेल प्रशिक्षण शाळेने दाखवून दिले की नर्सिंगचे काम फक्त बिछान्यांच्या चादरी बदलणे आणि आजाऱ्यांना अन्न खाऊ घालणे एवढेच नसते. पहिल्यांदाच नर्सनी गणवेष घालून परीक्षा दिल्या.

### खिडक्या आणि पडदे

फ्लोरेन्सच्या काही सुधारणा साध्यासरळ होत्या, जसे हॉस्पिटलच्या खिडक्या उघडणे! अनेकांच्या मते ताजी हवा आजार पसरवतात म्हणून, खिडक्या हिवाळ्याच्या सुरुवातीलाच बंद करून ठेवल्या जात.

बऱ्याच हॉस्पीटलमध्ये शौचालये नव्हती, बिछान्यांखाली शौचासाठी भांडी ठेवलेली असत. ती नेहमी शौचाने भरून गेलेली असत.



फ्लोरेन्सने आपल्या हॉस्पीटलमध्ये प्रत्येक दोन रुग्णांच्या बिछान्यांदरम्यान पडदे लावण्याची व्यवस्था केली. त्यापूर्वी एखाद्या रुग्णाचे ऑपरेशन इतर बिछान्यांवरील रुग्णांसमोरच होत असे.

## काही महत्त्वाच्या तारखा

**फ्लोरेन्स नाइटिंगेलचा जीवनक्रम**

1820 फ्लोरेन्सचा जन्म 12 मे रोजी, इटलीच्या फ्लोरेन्स शहरात झाला.

1837 व्हिक्टोरिया इंग्लंडच्या महाराणी बनल्या. फ्लोरेन्स यूरोपच्या दौऱ्यावर गेली.

1851 जर्मनीतील डसेलडोर्फ शहरातील कैसरवर्थ संस्थेत तीन महिने काम केले.

1853 लंडनच्या हार्ले स्ट्रीट भागात आपले पहिले हॉस्पीटल चालवले.

1854 क्रिमिया युद्ध सुरू झाले. नोव्हेंबरमध्ये फ्लोरेन्स सैन्याच्या हॉस्पिटलमध्ये काम करण्यासाठी तुर्कस्थानातील स्कुटरी गावात गेली.

1855 फ्लोरेन्स गंभीर आजारी पडली आणि नंतर बरीही झाली.

1856 युद्ध समाप्त झाले. फ्लोरेन्स इंग्लंडला परतली आणि महाराणी व्हिक्टोरियांना भेटली.

1860 लंडनमध्ये नर्ससाठी नाइटिंगेल प्रशिक्षण शाळा सुरू झाली.

1901 महाराणी व्हिक्टोरियाचे निधन.

1907 फ्लोरेन्सला ऑर्डर ऑफ मेरिटने सम्मानित केले गेले.

1910 13 ऑगस्ट रोजी फ्लोरेन्सचा मृत्यू झाला.